जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २३.१२.२०२५**

‘‘ सोनसाखळी चोरी करणा-या सराईत आरोपीनां अटक करून एकुन ०७ सोनसाखळी चोरी चे गुन्हे उघडकीस.’’

दिनांक ०४/१२/२०२५ रोजी राबोडी पोलीस ठाण्याचे हददीत रात्री ११:३० वाजताचे सुमारास स्कुटरवर मागे बसुन प्रवास करणा-या ६५ वर्षे वयाचे महिलेच्या गळयातील ६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र दोन अज्ञात इसमांनी स्कुटी वरून येवुन जबरीने खेचुन घेवुन पळुन गेले बाबत राबोडी पोलीस स्टेशन, गुन्हा रजि.नं. ४६९/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९(६), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकारामध्ये गुन्हयातील फिर्यादी महिला या रोडवर खाली पडुन जखमी झाल्यामुळे घडलेल्या गंभीर गुन्हया संदर्भात मा.वरिष्ठांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत गुन्हे शाखेस सुचना दिल्या होत्या.

नमुद दाखल गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे कडून करण्यात येत असताना सतत १२ दिवस केलेल्या तपासामध्ये मिळालेल्या तांत्रिक माहीतीच्या आधारे गुन्हयातील संशयीत आरोपीत यांची माहीती प्राप्त करून मुंब्रा शिळफाटा परिसरात राहणारे आरोपीत नामे १) वसीम नुरमोहम्मद शेख २) यासीन सिराज खामरे यांना सापळा रचुन शिताफिने ताब्यात घेवुन प्रस्तुत गुन्हयामध्ये दिनांक १८/१२/२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपींची नांवे :-

१) वसिम नुरमोहम्मद शेख वय ३१ वर्षे, रा.ठि. सध्या राह.रूम ६०५, मिल्लत कॉम्प्लेक्स, शिळफाटा पेट्रोलपंप जवळ, मुंब्रा जि.ठाणे

२) यासीन सिराज खामरे वय-२२ वर्षे राह-रूनं ७०५, हाजी उस्मान हाईटस, खडी मशिन रोड, मुंब्रा, ठाणे

अटक आरोपीत यांचे कडे केलेल्या कौशल्यपुर्वक तपासामध्ये त्यांनी दाखल गुन्हयासह ठाणे व नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात ०७ सोनसाखळी चोरीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न करून गुन्हयांमध्ये त्यांनी जबरीने चोरी केलेले एकुन ११८ ग्रॅम वजनाचे १४,१६, ०००/-रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने व ६०,०००/-रू कि ची गुन्हयामध्ये वापरलेली ज्युपिटर मोटार स्कुटर असा एकुन १४,७६,०००/- रूपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत केला आहे.

उघडकिस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे :

अ.नु	पोलीस स्टेशन	गुन्हा रजि क्र. व कलम
१	राबोडी पोलीस स्टेशन	गुरन. ४६९/२०२५ भा.न्या.स.२०२३ चे ३०९(६),३(५) प्रमाणे
२	कळवा पोलीस स्टेशन	गुरन. ७५८/२०२५ भा.न्या.स.२०२३ चे ३०९(४) ३(५) प्रमाणे
३	कळवा पोलीस स्टेशन	गुरन. ८१८/२०२५ भा.न्या.स.२०२३ चे ३०९(६) प्रमाणे
४	चितळसर पोलीस स्टेशन	गुरन ५३९/२०२५, भा.न्या.स.२०२३ चे कलम ३०९(४),३(५) प्रमाणे
५	मुंब्रा पोलीस स्टेशन	गुरन १३२२/२०२५, भा.न्या.स.२०२३ चे कलम ३०९(४) प्रमाणे
६	रबाळे पोलीस स्टेशन,नवी मुंबई	गुरन ८६१/२०२५ भा.न्या.स.२०२३ चे कलम ३०९(६),३(५) प्रमाणे
७	रबाळे पोलीस स्टेशन,नवी मुंबई	गुरन ८८२/२०२५ भा.न्या.स.२०२३ चे कलम ३०९(६),३(५) प्रमाणे

असे सोनसाखळी चोरीचे एकुण ०७ गुन्हे उघडकिस आणुन ११८ ग्रॅम वजनाचे एकुन १४,१६,०००/-रूपये किमतीचे सोन्याचे व दागिने ६०,०००/-रू कि ची गुन्हयामध्ये वापरलेली ज्युपिटर मोटार स्कुटर असा एकुन १४,७६,०००/- रूपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत केला आहे.

<u>अटक आरोपी याचा गुन्हे अभिलेख</u>

आरोपीत क्रमांक १ - वसीम नुरमोहम्मद शेख याचे विरोधात अंधेरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ४१७/२०२५ बीएनएस कलम ३०९(४),३(५) प्रमाणे सोनसाखळी जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे.

आरोपीत क्रमांक २ - यासीन सिराज खामरे यांचे विरोधात वर्तकनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १०५९/२०२५ बीएनएस कलम ३०९(४),३(५) प्रमाणे सोनसाखळी जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे.

सदरची कामगिरी श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध-१), गुन्हे शाखा यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सचिन गायकवाड, पोउपनि/दिपक घुगे, सहा.पो.उप निरी./दयांनद नाईक, दिपक जाधव, सुनिल माने, पोहवा/संदीप महाडीक, प्रशांत निकुंभ, शशिकांत सावंत, पोशि/सागर सुरळकर, पोशि/अमोल ढावरे, पोशि/प्रशांत लवटे, पोशि/मयुर लोखंडे यांनी केली आहे .

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर